क्रमांक डिएसआर-२००४/प्र.क्र. २०३/आस्था-५
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनाक - १८ नोव्हेंबर, २००६.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, ( सर्व )

विषय- जिल्हा परिषदेतील प्राथमिक/ माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी/ निवडश्रेणी लागू करण्याबाबत

संदर्भ- शासन पत्र शालेय शिक्षण विभाग क्र. पीआरई/३८१५/प्राशि-१, दि. १६/३/२००४.

वरील विषयाबाबत शासन पत्र समक्रमांक दि. २०/११/२००४ व २७/१/२००६ नूसार जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांना व माध्यमिक शिक्षकांना निवडश्रेणीसाठी शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले होते. यात काही त्रुटी राहील्याने निवडश्रेणी देण्याबाबत निर्माण झालेली संदिग्धता दूर करण्याच्या दृष्टीने व शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भाधीन पत्रातील स्पष्टीकरण विचारात घेऊन पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हतेबाबत स्पष्टीकरण देण्यात येत आहे:-

१) प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी प्राप्त करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता प्रशिक्षित पदविधराची अर्हता म्हणजे एस.एस.सी/ एच.एस.सी, डी.एड. ही प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकाच्या अर्हतेसह बी.ए., बी.कॉम, बी.एससी. किंवा मान्यताप्राप्त विदयापीठाची समकक्ष पदवी आवश्यक आहे.

२) माध्यमिक शिक्षक, पदविधर प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांना निवडश्रेणी प्राप्त करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता बी.ए./ बी.कॉम./ बी.एससी. अथवा मान्यताप्राप्त विदयापीठाची समकक्ष पदवी सह बी.एड. व एम.ए./ एम.कॉम./ एम.एससी, एम.फील. किंवा पी.एचडी. अथवा मान्यताप्राप्त विदयापीठाची समकक्ष पदव्युत्तर पदवी आवश्यक आहे.

२. सदर पत्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दिलेल्या अभिप्रायानूसार निर्गमित करण्यात येत आहे.

( विश्वनाथ हंचाटे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत

विभागीय आयुक्त, (सर्व विभाग)
निवडनस्ती, कार्या.क्र. आस्था-५
सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पदविधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख सभा, मु.पो. चाकण (विदयाधाम कॉलनी), ता. खेड, जि. पुणे.